


# हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com
७७ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे




■ वर्ष ७७ वे/अंक ३ रा ■ ■ अमरावती,मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २७ श्रावण १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# मुख्यमंत्री फडणवीसांची प्रधानमंत्री मोदींसोबत भेट

## महाराष्ट्रातील प्रलंबित प्रकल्पांसाठी चर्चा



नवी दिल्ली दि. १७ : महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास आणि दळणवळण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय पर्यावरण, वन व हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन महत्वपूर्ण चर्चा केली.

मुख्यमंत्री फडणवीस दिल्ली दौऱ्यावर असून, त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील विविध विकासकामे, प्रलंबित प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री मोदी यांना राज्यातील प्रशासनाची सद्यस्थिती तसेच केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

राज्यातील विविध प्रकल्प वेगवेगळ्या टप्प्यांवर असून, त्यांना अधिक गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेल्या *(उर्वरित पान २ वर)*

# विनोद तावडे राष्ट्रीय सरचिटणीस

## तर स्मृती इराणींना अखेर मोठी जबाबदारी; भाजपची नवी टीम



नवी दिल्ली दि. १७ : आगामी लोकसभा आणि उत्तर प्रदेशसह विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुका लक्षात घेता भाजपने आपली नवीन राष्ट्रीय टीम जाहीर केली आहे. त्यामध्ये खासदार विनोद तावडे यांच्याकडे राष्ट्रीय सरचिटणीसपदाची जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. तर लोकसभा निवडणुकीनंतर राजकारणातून काहीशा बाजूला पडलेल्या स्मृती इराणी यांना पक्षात जबाबदारी देण्यात आली आहे. त्याचसोबत राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे शिंदे यांनाही पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत संधी दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी पक्षाची बहुप्रतिक्षित नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली आहे. या नव्या चमूमध्ये आगामी राज्य विधानसभा निवडणुका आणि प्रादेशिक समतोल लक्षात घेऊन अनेक महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहेत. या कार्यकारिणीत युवा आणि महिला नेतृत्वाला विशेष स्थान देण्यात आले असून *(उर्वरित पान २ वर)*

# २१ ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार?



नवी दिल्ली दि. १७ : गेल्या काही दिवसांपासून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत संपूर्ण देशात चर्चा आहे. अशातच आता या विस्ताराची तारीख समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २१ ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. यात काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. त्याच बरोबर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शिक्षण खात्याची जबाबदारी कोणत्या नेत्याला मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रात जाणार का? या बहुचर्चित प्रश्नाचे उत्तरही २१ ऑगस्टला मिळणार आहे.

**२१ ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराची शक्यता**

समोर आलेल्या माहितीनुसार, २१ ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. २०२४ साली मोदी सरकारचा शपथविधी झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाचा एकदाही विस्तार झालेला नाही. त्यामुळे मोदी सरकारच्या या पहिल्याच मंत्रिमंडळ विस्ताराकडे देशाचं लक्ष लागले आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात नेमकी कुणाला संधी मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**धर्मेंद्र प्रधान यांचे मंत्रिमंडळात पुनरागमन?**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत अनेक प्रश्न समोर येत आहेत. यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे काही दिवसांपूर्वी शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिलेल्या धर्मेंद्र प्रधानांची कॅबिनेटमध्ये पुन्हा एन्ट्री होणार का? हा आहे. विद्यार्थी आंदोलनामुळं राजीनामा द्यावा लागलेल्या धर्मेंद्र प्रधान यांची मंत्रिमंडळात पुन्हा एन्ट्री होणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाणार की महाराष्ट्रातच राहणार? या प्रश्नाचेही उत्तर समोर येणार आहे.

# ओबीसींसाठी आरक्षित सरपंचपदांची संख्या पूर्वीच्या तुलनेत ५१२ ने कमी होणार; १५ जिल्ह्यांतील आरक्षणासाठी सुधारित आदेश

मुंबई दि. १७ : राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाने १५ जिल्ह्यांतील इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) सरपंचपदांच्या आरक्षणाबाबत सुधारित आदेश जारी केले आहेत. या नवीन निर्णयामुळे राज्यातील १५ जिल्ह्यांत ओबीसींसाठी आरक्षित सरपंचपदांची संख्या पूर्वीच्या तुलनेत ५१२ ने कमी होणार असून, ही पदे आता खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आली आहेत.

**आरक्षणाची पार्श्वभूमी आणि बदल**

राज्य निवडणूक आयोगाने १३ जून २०२५ रोजी आरक्षण निश्चितीची अधिसूचना प्रसिद्ध केली होती. या अधिसूचनेनुसार १५ जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींमध्ये ओबीसी प्रवर्गासाठी एकूण ६ हजार ७१९ सरपंचपदे आरक्षित ठेवण्यात आली होती. मात्र, ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेचे पालन करण्याच्या आयोगाच्या निर्देशानंतर ग्रामविकास विभागाने ३० एप्रिल रोजी नवीन सुधारित आदेश जारी केले. या आदेशानुसार, ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षित पदांची संख्या आता ६ हजार २०७ इतकी निश्चित करण्यात आली आहे. म्हणजेच पूर्वी जाहीर केलेल्या पदांमधून ५१२ पदे कमी करण्यात आली आहेत. ओबीसी आरक्षणातील ही ५१२ पदे कमी झाल्याने त्याचा थेट लाभ खुल्या प्रवर्गाला मिळाला आहे. खुल्या प्रवर्गासाठी पूर्वी १३ हजार ७७ पदे निश्चित करण्यात आली होती, ती संख्या आता ५१२ ने वाढून १३ हजार ५८९ इतकी झाली आहे. ५० टक्क्यांच्या मर्यादेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी १५ जिल्ह्यांत हे सुधारित समीकरण लागू करण्यात आले आहे.

**अन्यथा २९ ऑगस्टनंतर सरकारची जिरवणार; मनोज जरांगेंचा थेट इशारा**

दुसरीकडे, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा आक्रमक झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई, खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा अशा राज्यातील सर्व भागांमध्ये मराठ्यांवर आणि कुणबींवर अन्याय होत असल्यास एकजुटीने आणि आक्रमकपणे उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे होणाऱ्या आंदोलनाची

# 'ना डावे, ना उजवे, आम्ही संधीसाधू' ही प्रवृत्ती वाढतेय : नितीन गडकरी



पुणे दि. १७ : 'राजकारण आणि समाजकारणात विचारभिन्नतेपेक्षा विचारशून्यता वाढत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. एखाद्याचा विचार पटला नाही तरी त्याचा सन्मान करण्याची आपली संस्कृती आहे. मात्र, विचारधारा आणि तत्त्वांपेक्षा परिस्थितीनुसार भूमिका बदलण्याचे प्रमाण वाढले आहे. 'ना डावे, ना उजवे, आम्ही संधीसाधू' ही प्रवृत्ती वाढत आहे. अशा काळात व्रतस्थ, एकनिष्ठ, तत्त्वनिष्ठ व्यक्ती समाजासाठी दीपस्तंभ ठरतात', असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

पुणेपत्रकार प्रतिष्ठान आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी यांच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल गडकरी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, प्रतिष्ठानचे कार्यवाह पांडुरंग सांडभोर आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, 'विजयाचे अनेक *(उर्वरित पान २ वर)*

# पहाटेच्या साखरझोपेतच हॉटेलमधील अग्नितांडवात ७ जण जिवंत जळाले

बीरभूम दि. १७ : पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील एका हॉटेलमध्ये आग लागली. यात सात जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. एसी युनिटमधील शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रावण सोमवारच्या उत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी तारापीठ मंदिराला भेट दिली होती. ते तेथील एका हॉटेलमध्ये थांबले होते. पहाटे साडे चारच्या सुमारास ते झोपलेले असताना आग लागली. अग्निशमन दलाला घटनेची माहिती मिळताच आग नियंत्रणात आणण्यात आली. हॉटेलमध्ये अडकलेल्या भाविकांना बाहेर काढले जात आहे. जखमींना रामपूरहाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या दुर्घटनेतून बचावलेल्या कोलकाता येथील एका महिलेने सांगितले, अचानक संपूर्ण हॉटेल धुराने भरले. आम्हाला श्वास घेता येत नव्हता आणि बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे कठीण झाले होते.

**दोषपूर्ण एसी वायरिंगमुळे आगीचा धोका**

एसीमधील शॉर्ट सर्किटमुळे विजेच्या प्रवाहात अचानक वाढ होऊ शकते. यामुळे एसी वायरिंगमधील इन्सुलेशन गरम होऊन जळू शकते, ज्यामुळे तारा एकमेकांच्या संपर्कात येतात. या प्रक्रियेदरम्यान ठिणग्या पडून आग लागू शकते.

**तारापीठ मंदिर हे देवी ताराला समर्पित**

तारापीठ मंदिर हे पश्चिम बंगालच्या बीरभूम जिल्ह्यात असलेले, देवी ताराला समर्पित एक प्रसिद्ध मंदिर आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. येथील मूर्तीमध्ये भगवान शिव देवी ताराच्या मांडीवर बसलेले दाखवले आहेत. दिवसा सोन्याचा *(उर्वरित पान २ वर)*

# श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी मंदिरात चेंगराचेंगरी; ७ भक्तांचा मृत्यू

लखीसराय दि. १७ : बिहारच्या लखीसरायमध्ये श्रावण महिन्याच्या तिसऱ्याच सोमवारी भीषण दुर्घटना घडली आहे. मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत सात भक्तांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. लखीसरायचे जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. मंदिरातील चेंगराचेंगरीत भक्तांच्या मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

विजेचा खांब पडल्यानंतर शॉक बसत असल्याची अफवा भक्तांमध्ये पसरली. त्यानंतर भक्तांनी एकच धावाधाव केली. त्यात दुर्दैवाने काही भक्तांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महिलांचा समावेश अधिक आहे. या घटनेतील जखमींना तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ६ वाजता ही दुर्घटना घडल्याचे सांगितले. चेंगराचेंगरी झाल्यानंतर भक्त मंदिरात धावू लागले. लोकांनी मंदिरातील बॅरिकेट्स पाडून धावाधाव सुरू केली. यावेळी काही भक्त *(उर्वरित पान २ वर)*

# मुंबई ते बंगळुरू ५ तासांत तर पुणे ते छत्रपती संभाजीनगर २ तासांत प्रवास, गडकरींचा मास्टर प्लॅन

पुणे दि. १७ : पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझं स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. या सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाची गरज नसले असंही गडकरी म्हणाले. तसेच मुंबई ते बंगळुरू हा प्रवास पाच तासात होईल, असे रस्ते बनवण्यात येत असल्याचं गडकरींनी सांगितलं. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना गडकरी यांनी सांगितले की, पुण्यात सध्या वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या शिरूर ते पुणे प्रकल्पाचाही समावेश आहे.

**पुण्यातील प्रमुख प्रकल्प आणि निधी**

गडकरी यांनी पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली. हडपसर-यावत मार्गासाठी ५,२६५ कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमीच्या टप्प्यासाठी *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




हा चांगले शिक्षण आणि नोकरी मागत आहे म्हणजे हा दिमागी नक्षल असून भारतात अस्थिरता निर्माण करत आहे...यांच्यापासून बाकी लोकांना वेगळे केले गेले पाहिजे!




